रे.क.नं. २१४/२०१२ मधील निशाणी ५ वरील आदेश.

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी प्रतिवादी नं. ३ यांनी दावा मिळकतीचा ताबा घेवू नये यासाठी मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांना दाव्यातील मुळ नावाने वादी व प्रतिवादी असे संबोधले आहे.

२. अर्जदार यांची केस खालीलप्रमाणे —

मौजे दानोळी येथील गट नं. १४८६ क्षेत्र ७१ आर ही मिळकत या अर्जाचा वाद विषय असून त्यास दावा मिळकत असे संबोधले आहे.

३. अर्जदार यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकत त्यांची वडिलोपार्जीत मिळकत असून उत्तरेस प्रतिवादी नं. ४ ते १० यांच्या मालकीची गट नं. १४८८ ही मिळकत आहे. सदर जमीनी पैकी प्रतिवादी नं. ८ यांना ४० आर व प्रतिवादी नं. ९ व १० यांना ४० आर मिळकत पुर्नवसन योजने खाली मिळाली व सन १९९० पासून सदर मिळकत त्यांच्या कब्जात आहे. परंतु प्रतिवादी नं. ९ व १० यांनी सन २००२ मध्ये मोजणीचा अर्ज दिला व सदर मोजणीत वादी यांनी ७१ आर अतिक्रमण प्रतिवादी यांच्या जमीनीवर केल्याचे आढळले. त्यानंतर प्रतिवादी नं. ४ ते ७ यांनी उप—विभागीय अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन सदर क्षेत्राचा कब्जा मागितला. परंतु वादी यांच्या आक्षेपाचा विचार न करता प्रतिवादी नं. ३ यांनी अनाधिकाराने सदर क्षेत्राचा कब्जा काढून घेण्याची नोटीस दि. २९.५.२०१२ रोजी दिली. म्हणून वादीला प्रस्तुतचा दावा दाखल करावा लागला व मनाई हुकूम मागावा लागला.

४. प्रतिवादी नं. १ ते ५ यांच्या विरुध्द दावा विना कैफियत चालला. प्रतिवादी नं. ६, ८ व १० यांनी निशाणी ४४ वर म्हणणे सादर केले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे गट नं. १४८८ पैकी प्रत्येकी ४० आर क्षेत्र प्रतिवादी नं. ८ व १० यांना धरणग्रस्त म्हणून कब्जेपट्टीने सन १९९२ साली मिळाले. परंतु वादीने सदर क्षेत्रावर अतिक्रमण केले, म्हणून त्यांनी मोजणीसाठी दिलेल्या अर्जाप्रमाणे असे आढळले की वादी यांनी प्रतिवादी नं. ८ व १० यांच्या मिळकतीवर प्रत्येकी १३.५ आर क्षेत्रावर व प्रतिवादी नं. ४ ते ७ यांच्या ४४ आर क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे. सदर अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मागून दिला नाही. म्हणून सदर ताब्याबाबत महसुल कार्यालयात प्रश्न उपस्थित केल्यानंतर प्रतिवादी नं. ३ यांनी दि. ३.५.२०१२ रोजी नोटीस वादीला दिली आहे. म्हणून त्यांनी प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

५. उभयपक्षांची कथने विचारात घेवून, खालील मुद्दे निश्चित केलेले आहेत. सदरचे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणासहित खालीलप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. वादीला सकृतदर्शनी संयुक्तिक बाजु आहे काय ? | ... होकारार्थी. |
| २. न्यायाचा तराजु वादीच्या हक्कात आहे काय ? | ... होकारार्थी. |
| ३. मनाई न दिल्यास वादीचे कधीही पैशात न भरुन येणारे नुकसान होईल असे वादीने शाबीत केले आहे काय ? | ... होकारार्थी. |

४. आदेश काय ?		..अंतिम आदेशाप्रमाणे.

<u>का र ण मि मां सा</u>

<u>मुद्दे क्रं. १ ते ३ :</u>

६.	वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संबंधीत असल्यामुळे ते एकत्रीतपणे विचारात घेतलेले आहेत.

७.	वादी चे विधिज्ञ यांनी युक्तीवाद केला की, वादी यांच्या मालकीची दावा मिळकत आहे याबद्दल वाद नसून प्रतिवादी नं. ४ ते १० हे लगतचे धारक आहेत त्याबद्दलही वाद नाही. त्यांनी युक्तीवाद केला की, ज्या वादग्रस्त मोजणीच्या आधारे वादीनी अतिक्रमण केल्याचे प्रतिवादींचे म्हणणे आहे, ती मोजणी बरोबर असल्याचे निष्पन्न होत नाही तो पर्यंत वादीने अतिक्रमण केल्याचे निष्पन्न होत नाही. म्हणून प्रतिवादी नं. ३ यांना सदर मोजणीच्या आधारे दावा मिळकतीमधील क्षेत्राचा ताबा घेता येणार नाही. म्हणून त्यांनी मनाई अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

८.	सरकारी अभियोक्ता यांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी नं. ८ ते १० यांना पुर्नवसन कायद्याखाली जमीन मिळालेली आहे व सदर जमीनीच्या वहिवाटीस हरकत केल्यास सदरच्या हरकतीचे निराकरण करण्याचे अधिकार प्रतिवादी नं. १ ते ३ यांना आहेत. अशा परिस्थितीत प्रतिवादी यांच्या जमीनीवर अतिक्रमण झाल्याची तक्रार प्राप्त झाल्यावर रितसर मोजणी करण्यात आली व सदर मोजणीत वादीनी प्रतिवादींच्या जमीनीवर एकुण ७१ आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले. अशा परिस्थितीत सदर अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा काढून प्रकल्पग्रस्त व्यक्तीना देण्याची प्रतिवादी नं. १ ते ३ यांची

नोटीस कायदेशीर आहे व त्या अनुषंगाने वादीना पाठविण्यात आलेली नोटीस कायदेशीर आहे. त्यांनी युक्तीवाद केला की, कायदेशीरपणे कृती करण्यास सरकारी अधिकारी यांना मनाई करण्याचे अधिकार न्यायालयाला नाहीत. म्हणून त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

९. इतर प्रतिवादींचे विधिज्ञ यांनी युक्तीवाद केला की, ज्या मोजणीबद्दल वादीनी आक्षेप घेतला आहे ती मोजणी सन २०११ मध्ये झाली, परंतु सदर मोजणीबाबत वादीने अपील केलेले नाही. शिवाय मोजणी मान्य नाही म्हणून निमताना मोजणीची मागणी केली नाही. यावरुन वादी यांचे वर्तन सद्भावपूर्ण नाही असे दिसून येते. त्यांनी युक्तीवाद केला की, खरेच मोजणी मान्य नसती तर वादी यांनी सदर मोजणीबाबत आक्षेप घेतला असता. परंतु वादीनी सदर मोजणीस आक्षेप घेतला नाही. त्यामुळे आता वादीला आक्षेप घेण्याचा अधिकार नाही. त्यांनी युक्तीवाद केला की, अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा धरणग्रस्त प्रतिवादी यांना देण्याचे अधिकार संबंधीत कायद्या अंतर्गत महसुली अधिकारी यांना आहेत. त्याचाच भाग म्हणून सुरु केलेल्या कारवाईला वादीला मनाई मागता येणार नाही. म्हणून त्यांनी प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

१०. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद व रेकॉर्डवरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि. ३.५. २०१२ रोजीची नोटीस मंडल अधिकारी, जयसिंगपूर यांनी वादी व इतर हिस्सेदार यांना दिलेली असून, सदर नोटीसचे अवलोकन केले असता असे दिसते की, सदर नोटीस अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा देण्या

संदर्भात आहे. रेकॉर्डवरुन असे दिसून येते की, प्रतिवादी नं. ८ ते १० यांच्या तक्रारी वरुन मोजणीची कारवाई करण्यात आली होती. सदर मोजणीत वादी यांनी प्रतिवादी नं. ४ ते ७ यांच्या क्षेत्रावर ४४ आर व प्रतिवादी नं. ८ ते १० यांच्या क्षेत्रावर प्रत्येकी १३.५ आर क्षेत्रावर अतिक्रमण आढळून आले. त्यामुळे अतिक्रमण क्षेत्राचा ताबा देण्याच्या संदर्भाने मंडळ अधिकारी, जयसिंगपूर यांनी दि. ३.५.२०१२ रोजी नोटीस वादी व इतर सह हिस्सेदाराना दिली.

११. परंतु झालेली मोजणी कायदेशीर नसल्याबाबत व चुकीची असल्याबाबत वादीचे कथन आहे. सदर मोजणी बरोबर आहे किंवा चुक आहे याबाबतचा निष्कर्ष दोन्ही पक्षानी पुरावा दिल्यानंतरच काढता येईल. अशा परिस्थितीत आज रोजी सदर मोजणी बरोबर आहे असे गृहीत धरुन कारवाई केल्यास वादीच्या ताब्यातील क्षेत्र काढून घेण्यात येईल व त्या क्षेत्रावरील वादीचा कब्जा जाईल. अशा परिस्थितीत सदर मोजणीबाबत आपला पक्ष मांडण्याची संधी न मिळताच वादीला सदर क्षेत्रापासून मुकावे लागेल. त्यामुळे वादीचे अपरिमित नुकसान होईल. म्हणून वादी यांना प्रथमदर्शनी संयुक्तिक बाजू आहे.

१२. रेकॉर्डवरुन असे दिसून येते की, वादग्रस्त क्षेत्राचा ताबा आज रोजी वादीकडे आहे. वादी सदर क्षेत्रास पात्र नसल्यास सदर क्षेत्राचा ताबा पुराव्यानंतरच्या निष्कर्षानंतर घेता येईल व त्याबाबतीत वादीकडून नुकसान भरपाईही वसुल करता येईल. परंतु आज रोजी मोजणीबाबत पुराव्याची संधी न देता ताबा काढून घेतल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल. अशा परिस्थितीत वादग्रस्त क्षेत्राचा ताबा

वादीकडे असल्यामुळे न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने झुकलेला आहे.

१३. हे खरे आहे की, प्रकल्पग्रस्त व्यक्तीच्या अडचणी व तक्रारी निराकरण करण्याचे अधिकार संबंधीत कायद्यान्वये महसुली अधिकारी यांना आहेत. परंतु असे असले तरी मंडल अधिकारी यांनी दिलेली नोटीस दि. ३.५.२०१२ ही संबंधीत कायद्या अंतर्गत दिलेली दिसून येत नाही, शिवाय सदर नोटीस संबंधीत कायद्यान्वये दिली असे मान्य केले तरी वर उल्लेख केल्याप्रमाणे दावा मिळकतीवर असणारा वादीचा शांततामय ताबा, वादी यांना मोजणी बाबत बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय घेता येणार नाही.

१४. वर उल्लेख केल्याप्रमाणे वादी यांनी प्रथमदर्शनी केस शाबीत केली आहे, शिवाय न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने झुकलेला आहे. अशा परिस्थितीत मनाई हुकूम नाकारल्यास दावा मिळकतीवरील वादग्रस्त क्षेत्रावरचा वादीचा ताबा जाईल. त्यामुळे वादीचे पैशाने न भरुन येणारे नुकसान होईल. परंतु जर प्रतिवादी यांनी असे सिध्द केले की, सदर क्षेत्रावर वादीने बेकायदेशीर कब्जा केला होता, तर त्यांना नुकसान भरपाई मागता येईल.

१५. वरील कारणासाठी वादी तर्फे करण्यात आलेला युक्तीवाद कायदेशीर व पटण्याजोगा आहे. याउलट प्रतिवादी यांच्या तर्फे करण्यात आलेला युक्तीवाद वरील कारणासाठी पटण्याजोगा नाही. म्हणून वरील कारणासाठी मुद्दे क्र. १ ते ३ होकारार्थी उत्तरले आहेत. म्हणून खालील आदेश.

## आदेश

१. अर्ज निशाणी ५ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी अथवा त्यांच्या मार्फत इतर कोणीही वादी यांच्या दावा मिळकतीवरील ताब्याला कोणत्याही प्रकारे दाव्याचा अंतिम निकाल लागे पर्यंत हरकत व अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्यात येतो.

३. या अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालाप्रमाणे राहिल.

सही/—
(ना.रा.तळेकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
जयसिंगपूर.

दिनांक — २३.२.२०१५.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S.R. Ladekhan |
| Name of Court | Civil Court, Sr.Dn. Jaysingpur. |
| Date of decision | 23/02/15 |
| Judgment signed by the P.O. on | 23/02/15 |
| Judgment uploaded on | 24/02/15 |